पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा पूर्व परीक्षा - २०२३
दि. १० डिसेंबर, २०२३

**A** → संच क्रमांक

**2023**

**F18**

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET NO. 129549

# प्रश्नपुस्तिका
# मराठी, इंग्रजी व सामान्य अध्ययन

वेळ : 1 ( एक ) तास

एकूण प्रश्न : 100
एकूण गुण : 100

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

केंद्राची संकेताक्षरे ↑    ↑ शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तर-क्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्न-क्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच ''उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तराकरीता 25% किंवा 1/4 एवढे गुण एकूण गुणांमधून वजा/कमी करण्यात येतील.''**

**पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये**

SEAL

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या ''परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82'' यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com

1. योग्य जोड्या लावा.

| 'अ' गट | | 'ब' गट | |
|---|---|---|---|
| (a) | विकारी शब्दजाती | (i) | भाववाचक नाम |
| (b) | हिमालय, मंदाकिनी | (ii) | सामान्यनाम |
| (c) | पुस्तक, पर्वत | (iii) | विशेषनाम |
| (d) | पशुत्व, गोडी | (iv) | नाम |

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a)-(ii), (b)-(iv), (c)-(i), (d)-(iii)
(2) (a)-(iv), (b)-(iii), (c)-(ii), (d)-(i)
(3) (a)-(iii), (b)-(i), (c)-(iv), (d)-(ii)
(4) (a)-(ii), (b)-(i), (c)-(iv), (d)-(iii)

---

2. योग्य विरामचिन्हे वापरुन लिहिलेले वाक्य शोधा.

(a) त्याने विचारले, आवडले का तुला हे पुस्तक ?
(b) 'त्याने विचारले ! आवडले का तुला, हे पुस्तक'
(c) त्याने विचारले ? 'आवडले का तुला हे पुस्तक'
(d) त्याने विचारले, "आवडले का तुला हे पुस्तक ?"

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (b) बरोबर
(2) फक्त (b) व (c) बरोबर
(3) फक्त (c) बरोबर
(4) फक्त (d) बरोबर

---

3. 'पगडी फिरवणे' या वाक्प्रचाराचा खालीलपैकी कोणता अर्थ आहे ?

(1) पश्चाताप होणे
(2) स्वार्थापायी पक्ष बदलणे
(3) माघारी फिरणे
(4) निंदा करणे

---

4. अयोग्य जोडी ओळखा.

(1) शृंग – शिखर (2) शागिर्द – संकट (3) सर्प – तक्षक (4) क्षेम – मंगल

---



www.mpscmaterial.com

5. वर्णमालेत स्वतंत्र दंड असणारी व्यंजने किती आहेत ?

(1) 02 (2) 03 (3) 09 (4) 01

6. जे विशेषण विशेष्याच्या नंतर येते त्याला __________ असे म्हणतात.

(1) अधिविशेषण (2) विधिविशेषण (3) धातूसाधित विशेषण (4) सार्वनामिक विशेषण

7. खालील व्यंजन गटातील घोष व्यंजनांचा गट ओळखा.

(1) क, ख, ग, घ (2) य, र, ल, व (3) ख, घ, छ, झ (4) च, छ, ज, झ

8. पुढील म्हणी व त्यांचे अर्थ यांच्या योग्य जोड्या जुळवा.

| 'अ' गट | | 'ब' गट | |
|---|---|---|---|
| (a) | गोगलगाय अन् पोटात पाय | (i) | क्षुद्र मनुष्य क्षुल्लक वस्तूच्या लाभाने आनंदतो. |
| (b) | कोल्हा काकडीला राजी | (ii) | लबाड मनुष्याकडून मिळेल तेच पुष्कळ. |
| (c) | चोराच्या उलट्या बोंबा | (iii) | आपणच गुन्हा करून ओरडा करणे. |
| (d) | चोराच्या हातची लंगोटी | (iv) | कपटी मनुष्य. |

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a)-(iv), (b)-(i), (c)-(iii), (d)-(ii) (2) (a)-(i), (b)-(iv), (c)-(ii), (d)-(iii)

(3) (a)-(iv), (b)-(iii), (c)-(i), (d)-(ii) (4) (a)-(i), (b)-(iii), (c)-(ii), (d)-(iv)

9. योग्य जोड्या जुळवा.

| 'अ' गट | | 'ब' गट | |
|---|---|---|---|
| (a) | केवलवाक्य | (i) | मी रोज सकाळी पहाटे उठतो व एक तासभर अभ्यास करतो. |
| (b) | मिश्रवाक्य | (ii) | आम्ही जातो आमुच्या गावा. |
| (c) | संयुक्त वाक्य | (iii) | पाऊस पडता तर हवेत गारवा आला असता. |
| (d) | संकेतार्थी वाक्य | (iv) | जे चकाकते, ते सोने नसते. |

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a)-(ii), (b)-(iv), (c)-(i), (d)-(iii) (2) (a)-(iv), (b)-(iii), (c)-(ii), (d)-(i)

(3) (a)-(iii), (b)-(i), (c)-(iv), (d)-(ii) (4) (a)-(ii), (b)-(i), (c)-(iv), (d)-(iii)

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.mpscmaterial.com

**10.** भाववाचक नाम साधण्यासाठी खालीलपैकी कोणती प्रत्यय वापरली जातात ?

(1) य, त्व, पण, पणा (2) ई, ता, की

(3) गिरी, वा, आई (4) वरीलपैकी सर्व

---

**11.** नियम : विसर्गापुढे 'श्', 'ष्', 'स्' आल्यास विसर्ग कायमच राहतो किंवा त्याबद्दलही अनुक्रमे श्, ष्, स् होतात. वरील नियमानुसार खालीलपैकी कोणता शब्द बनला आहे ?

(1) अंत:करण (2) दु:शासन (3) अध:पतन (4) प्रात:काल

---

**12.** खालीलपैकी व्यंजनसंधीची उदाहरणे असलेला पर्याय कोणता ?

(a) सज्जन, चिदानंद (b) तपोधन, दुरात्मा (c) ईश्वर, सुर्यास्त (d) महर्षी, विद्यार्थी

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) बरोबर (2) फक्त (b) बरोबर

(3) फक्त (c) व (d) बरोबर (4) सर्व पर्याय बरोबर

---

**13.** खाली दिलेली वाक्ये वाचून शब्दयोगी अव्ययें असलेले वाक्य निवडा.

(1) तूं खाली ये. (2) टेबलाखाली मांजर आहे.

(3) त्याने हात वर केले. (4) पूर्वी वानर फार होते.

---

**14.** योग्य जोड्या जुळवा.

| **'अ' गट** | | **'ब' गट** |
|---|---|---|
| (a) अपूर्ण भूतकाळ | (i) | त्याने अभ्यास केला. |
| (b) पूर्ण भूतकाळ | (ii) | तो अभ्यास करीत असे. |
| (c) रीती भूतकाळ | (iii) | तो अभ्यास करीत होता. |
| (d) साधा भूतकाळ | (iv) | त्याने अभ्यास केला होता. |

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a)-(ii), (b)-(iii), (c)-(iv), (d)-(i) (2) (a)-(iii), (b)-(iv), (c)-(i), (d)-(ii)

(3) (a)-(iv), (b)-(iii), (c)-(i), (d)-(ii) (4) (a)-(iii), (b)-(iv), (c)-(ii), (d)-(i)

---



www.mpscmaterial.com

15. खालील वाक्याचा प्रकार ओळखा.

आकाशात जेव्हा ढग जमतात तेव्हा मोर नाचू लागतात.

(1) मिश्र वाक्य (2) संयुक्त वाक्य (3) केवल वाक्य (4) आज्ञार्थी वाक्य

---

16. पुढीलपैकी पूर्णाभ्यस्त शब्द ओळखा.

(1) घरघर (2) शेजारीपाजारी (3) आडवातिडवा (4) गडगडाट

---

17. क्रिकेटचा अंतिम सामना हरल्यानंतर कर्णधाराने गोलंदाजांवर दोषारोप केले. या विधानातील अधोरेखित शब्दाला योग्य वाक्प्रचार ओळखा.

(a) नाकाने कांदे सोलणे (b) केसाने गळा कापणे (c) अंगाची लाही होणे (d) खापर फोडणे

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (b) बरोबर (2) फक्त (b) व (c) बरोबर

(3) फक्त (a) व (c) बरोबर (4) फक्त (d) बरोबर

---

18. खालीलपैकी देशी शब्दांचा अचूक गट ओळखा.

(1) झाड, दगड, रेडा, चिमणी (2) धोंडा, घोडा, डोळा, नदी

(3) दगड, झाड, चिमणी, घर (4) घर, दूध, गाव, बाजरी

---

19. पुढीलपैकी कोणती व्यंजने 'अनुनासिक' आहेत ?

(1) ङ्, ञ्, ण्, न्, म् (2) ड्, ढ, त्, थ्, म् (3) ङ्, ग्, ट्, ठ्, ण् (4) ड्, श, ह, ळ, ण्

---

20. पुढे दिलेल्या तत्सम शब्दाचा तद्भव शब्द ओळखा.

'अंजलि'

(1) प्रांजल (2) आभा (3) बांधणी (4) ओंजळ

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com

**पुढील उतारा वाचून प्रश्न क्रमांक 21 ते 25 या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

कोणतीही कला सोपी नाही. तेथे साधना लागते. तपेच्या तपे द्यावी लागतात. कला म्हणजे पूर्णता. कला परिपूर्णतेची अपेक्षा करते. खूप वाचा, उत्तमोत्तम नमुने वाचा, प्राचीन वागीश्वरी वाचा. अर्वाचीन वाग्भट अभ्यासा. प्रतिभावान नाटककार आणि थोर कवी गोविंदाग्रज यांना मोरोपंतांच्या पाच हजार ओव्या पाठ येत होत्या! मुक्तेश्वर म्हणतो, "एकेक अक्षराची भीक मागून मी हे लिहीत आहे. ज्ञानाच्या क्षेत्रात सीमा, सरहद्दी नाहीत. सारे जागतिक वाङ्मय तुमच्या समोर आहे. वडाचे झाड दूरवर पाळेमुळे पसरून ओलावा घेते. महान साहित्यिक, जेथून मिळेल तेथून सारे काही घेतो. स्वत:च्या भावनांच्या मुशीत, आपल्या वैशिष्ट्यांचा नि व्यक्तिमत्त्वाचा जिवंत ठसा त्यावर मारीत असतो. केवळ स्वयंभू असे जगात काही नाही. शेक्सपिअरने अनेक जुनी कथानके घेतली परंतु त्याने कोळसे घेऊन त्यांचे हिरे केले! कालिदासाने महाभारतातून शाकुंतल घेतले. परंतु नवीनच अभिनव वाग्विलास त्याने करून दाखवला. रवीन्द्रनाथांवर उपनिषदे–कबीर यांचा अपार परिणाम झाला आहे.

थोर ग्रंथांचे अध्ययन करा. परंतु तेवढ्याने भागणार नाही. जीवनग्रंथांचा खोल अभ्यास करा. प्रत्येक प्राणी म्हणजे विश्वग्रंथाचे पान आहे. प्रत्येक जीवन म्हणजे महाकाव्य आहे. ती जीवने तपासा. साहित्यिक असाल तर असा आगीचा डोंब पेटवा की ज्या समाजरचनेत हे शक्य होते, ती भस्म होईल. जा, शेतकऱ्यांची जीवने तपासा. खंडोगणती धान्य पिकवणारे देवाचे शेतकरी दुर्दैवी का? त्यांच्या मुलांना दोन दोन दिवस काकडीवर, आठ आठ दिवस आंब्यांच्या कोयांवर तर काहींना चिंचोक्यांवर राहण्याची पाळी का? साहित्यिक म्हणजे सहानुभूतीचा सागर! ज्या मानाने तुमची सहानुभूती मोठी त्या मानाने तुम्ही मोठे साहित्यिक. तुमच्या सहानुभूतीची लांबीरुंदी कोठवर पोचते ते पाहा.

म्हणून माझ्या मित्रांनो! तुम्ही दरिद्रीनारायणात मिसळा. त्यांचे संसार पाहा. तेथील प्रश्न अभ्यासा. तेथील दृश्ये पाहा. अन्याय, जुलूम, व्यसने, उपासमार, अज्ञान – सारे पाहा. आणि त्यांचे अमर ठसे उमटवून घेऊन त्यातून जिवंत साहित्य निर्माण करा. हे क्रांतीचे, प्रगतीचे युग आहे. व्यक्तिगत स्फूर्तीला सामुदायिक करून सर्वांच्या मनोबुद्धीभोवती असणारी बंधने तोडा. त्यांना ती दाखवा. तोडायला सांगा. आणि स्वसामर्थ्याची जाणीव झालेले हे कोट्यवधी बंधू क्रांतीकडे, नवसमाजरचनेकडे जावोत म्हणून ज्ञान–विज्ञानाचा संदेश भावनेच्या द्वारा तुम्ही पोचवा. तुम्हाला आजचे जीवन तपासायला मी सांगत आहे. त्यातील साऱ्या दुष्ट, भ्रष्ट गोष्टींवर हल्ले चढवायला सांगत आहे. तुम्ही आजकालचे व्यापक जीवन खोल जाऊन अभ्यासाच, केवळ पुस्तकातूनच नव्हे तर प्रत्यक्ष हिंडून, फिरून, मिसळून; परंतु त्याच्याबरोबरच जुना इतिहासही वाचा. महाराष्ट्र, भारतवर्ष यांचा इतिहास अभ्यासा. त्यातून तुम्हाला नवी दृष्टी मिळेल. भारताच्या दहा हजार वर्षांच्या इतिहासातील गति–नियम कळतील. तुमचा आत्मा आजच्या जीवनाशी मिसळाल; त्याचप्रमाणे हजारो वर्षे क्रांत–उत्क्रांत होत आलेल्या भारतीय आत्म्याचीही भेट घ्या. पंडित जवाहरलालांनी 'भारताचा शोध' म्हणून महान ग्रंथ नगरच्या स्वातंत्र्यमंदिरात लिहिला. भारताच्या अखंड विकासमान आत्म्याची अनंत कालखंडातून हिंडून त्यांनी भेट घेतली. जुने इतिहास, परंपरा, दंतकथा, आख्यायिका – या सर्वांचा अभ्यास हवा.



www.mpscmaterial.com

**21.** उत्तम साहित्यिक होण्यासाठी काय आवश्यक आहे ?

(1) थोर ग्रंथाचे अध्ययन करणे.

(2) मोठी सहानुभूती असणे.

(3) हिंडून, फिरून, मिसळून समाजजीवन अभ्यासणे.

(4) जुने इतिहास, परंपरा, दंतकथा, आख्यायिका अभ्यासणे.

---

**22.** दिलेल्या उताऱ्यातून कोणता निष्कर्ष काढता येतो ?

(1) भाषेचे महत्त्व सांगतो. (2) साहित्याच्या अभ्यासाचे महत्त्व सांगतो.

(3) दर्जेदार साहित्यनिर्मिती कशी करावी हे सांगतो. (4) समाजजीवनाचे चित्रण करतो.

---

**23.** प्रत्येक लेखक दुसऱ्याच्या आधारानेच आपली साहित्य निर्मिती करतो. या अर्थाची ओळ पर्यायांतून निवडा.

(1) एकेक अक्षराची भीक मागून मी हे लिहीत आहे (2) कलेची साधना लागते

(3) उत्तमोत्तम वाचन लागते (4) केवळ स्वयंभू असे जगात काही नाही

---

**24.** 'कोळसे घेऊन हिरे करणे' या वाक्याचा अर्थ स्पष्ट करा.

(1) सामान्यातून असामान्य करणे. (2) निष्कृष्टातून उत्कृष्ट करणे.

(3) वाईटातून चांगले करणे. (4) टाकाऊतून टिकाऊ करणे.

---

**25.** आजच्या दुष्ट, भ्रष्ट गोष्टीवर हल्ला चढवण्यासाठी काय करावे ?

(1) दरिद्रीनारायणात मिसळावे.

(2) शेतकऱ्याचे जीवन तपासावे.

(3) भावनेच्या द्वारे ज्ञान–विज्ञानाचा संदेश समाजापर्यंत पोहोचवणे.

(4) साहित्यनिर्मिती करावी.

---

**26.** Choose the correct suffix to make a noun form of :

**durable**

(1) -ity (2) -ness (3) -ism (4) -ment

---

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

www.mpscmaterial.com

27. Choose the word having nearest opposite meaning of the underlined word :

He is interested in the occult.

(1) Magical (2) Unique (3) Rational (4) Difficult

28. Choose the correct sentences :

(a) The table's leg was broken.

(b) The cover of the book was beautiful.

(c) The house's roof was painted.

**Answer options :**

(1) (b) only (2) (a) and (c) only

(3) (b) and (c) only (4) (a), (b) and (c)

29. Choose the correct sentences :

(a) I am knowing him for a long time.

(b) We have lived here for ten years.

(c) We haven't seen Padma for several months.

**Answer options :**

(1) (c) only (2) (a) and (c) only

(3) (b) and (c) only (4) (a), (b) and (c)

30. Which one of the following explains the meaning of the word 'Bibliophile' ?

(a) One who is a great collector of stamps.

(b) One who is a great lover of books.

(c) One who is an expert in preparing bibliography.

(d) One who is a lover of birds and plants.

**Answer options :**

(1) (d) only (2) both (b) and (c)

(3) (a) only (4) (b) only



कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com

31. "Travelling by metro is better than travelling by bus."

If this sentence is changed into negative, the form of sentence will be :

(1) Travelling by metro is not better than travelling by bus.

(2) Travelling by bus is not better than travelling by metro.

(3) Travelling by bus is not as good as travelling by metro.

(4) Travelling by metro is not as good as travelling by bus.

32. Fill in the blank :

You touched a _________ nerve when you mentioned his first wife.

(1) ripe (2) old (3) raw (4) outer

33. 'He can drive a sports car.'

The underlined modal verb expresses _________.

(1) Asking permission (2) Probability

(3) Ability (4) Necessity

34. "I normally go to Mumbai by train."

The underlined words in the given sentence are _________.

(1) Adjective phrase (2) Noun phrase

(3) Adverbial phrase (4) An Article

35. Choose the correct replacement for the underlined items :

The umbrella with a broken handle is mine.

(1) which had a broken handle (2) which has a broken handle

(3) that having a broken handle (4) which having a broken handle

36. Choose the nearest meaning of the underlined items :

Keep the news under your hat.

(1) Safe (2) Pure (3) Secret (4) Fresh

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com

**37.** Choose the correct option to fill in the blanks :

(a) The speakers came on to the platform in order of ________.

(b) There is no ________ for a disaster of this scale.

**Answer options :**

(1) Precedent, Precedent (2) Precedence, Precedent

(3) Precedence, Precedence (4) Precedence, Precaution

---

**38.** Choose the correct replacement for the underlined items :

They rested <u>at sunset</u>.

(1) When evening was coming. (2) When evening had come.

(3) When evening came. (4) When evening has come.

---

**39.** Fill in the blanks :

He decided to ________ the ________.

(1) sink, hatchet (2) bury, sword (3) dig, hatchet (4) bury, hatchet

---

**40.** Choose the option closest in meaning to the underlined word :

The drug <u>attenuates</u> the effects of the Virus.

(1) Show (2) Cure

(3) To make less effective (4) To make more effective

---

**41.** What does the underlined Modal Verb express in the sentence given below :

'People <u>should not venture</u> into the deep water of the ocean.'

(1) Probability (2) Suggestion (3) Compulsion (4) Moral Obligation

---



www.mpscmaterial.com

42. 'A thoroughly ignorant person'.

Which of the following words explains the above meaning ?

(a) illiterate (b) inhumane

(c) countryside fellow (d) ignoramus

**Answer options :**

(1) (c) only (2) (b) only

(3) both (a) and (c) (4) (d) only

---

43. Which one of the following is the correct meaning of the word :

"Diffident"

(1) lacking (2) hesitant (3) condemn (4) reveal

---

44. 'I still remember the joys of my childhood.'

Which one of the following is a correct complex sentence corresponding to the simple sentence above ?

(a) I remember the joys experienced in my childhood.

(b) I still remember the joys which I experienced in my childhood.

(c) I still remember the joys I experienced in childhood.

(d) I still remember the joys which I had experienced in my childhood.

**Answer options :**

(1) (d) only (2) (c) only (3) (b) only (4) (a) only

---

45. Choose the correct passive form of the given sentence :

One should keep one's promises.

(1) Promises should have kept. (2) Promises have been kept.

(3) Promises should be keeping. (4) Promises should be kept.

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com

**Read the given passage carefully and answer the questions 46 to 50 given below it.**

How long I remained in the room with the cobra I cannot say. My servant said later that it was only half an hour, and no sound has ever been more welcome to me than the sounds I heard as my servant laid the table for dinner. I called him to the bathroom door, and told him of my predicament, and instructed him to fetch a lantern and a ladder. After another long wait, I heard the babel of voices followed by the scrapping of the ladder against the outer wall of the house, when the lantern had been lifted to the window, ten feet above the ground, it did not illuminate the room, so I told the man who was holding it to break a pane of glass and pass the lantern through the opening. The opening was too small for the lantern to be passed in upright. However, after it had been relit three times, it was finally inserted into the room and feeling that the cobra was behind me, I turned my head and saw it lying at the bottom of the bedroom door two feet away. Leaning forward very slowly, I picked up the heavy bathmat, raised it high and let it fall as the cobra was sliding over the floor towards me. Fortunately, I judged my aim accurately and the bath-mat crashed down on the cobra's neck six inches from its head. As it bit at the wood and lashed about with its tail, I took a hasty stride towards the vernadah door and in a moment was outside among a crowds of men, armed with sticks and carrying lanterns, for word had got round to the railway quarters that I was having a life-and-death struggle with a big snake in a locked room.

---

**46.** The people who had gathered outside were :

(1) Passers by
(2) From railway quarters
(3) Snake charmers
(4) Strangers to the writer

---

**47.** The incident narrated in the passage is ________.

(1) Thrilling
(2) Dramatic
(3) Tragic
(4) Humorous

---

**48.** A large crowd had gathered outside the writer's room, presumably to :

(1) Break open the door of the room.
(2) Watch the writer's struggle with the Cobra.
(3) Kill the snake if it came out.
(4) Catch the snake.

---

**49.** The room in which the writer was locked in with the Cobra was his :

(1) Bedroom
(2) Bathroom
(3) Toilet
(4) Drawing Room

---

**50.** "It did not illuminate the room." Here "illuminate" can be replaced by :

(1) Light up brightly
(2) Throw faint light
(3) Enlighten
(4) Make colourful

---



www.mpscmaterial.com

51. ब्रिटीशांच्या काळात अनुद्योगीकरणाचे कोणते परिणाम भारतावर झाले होते ?

(a) शेतीवरचा भार कमी झाला
(b) स्वावलंबी ग्रामीण अर्थव्यवस्था उद्ध्वस्त झाली
(c) औद्योगिक केंद्राचा अस्त
(d) भारताच्या आर्थिक राष्ट्रवादाला चालना मिळाली

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (b) फक्त
(2) (b) आणि (c) फक्त
(3) (a), (b) आणि (c) फक्त
(4) (b), (c) आणि (d) फक्त

What were the effects of de-industrialization on India during British period ?

(a) Burden on agriculture was decreased
(b) Independent rural economy was destroyed
(c) Decline of industrial centres
(d) Drive for economic Nationalism in India

**Answer options :**

(1) (a) and (b) only
(2) (b) and (c) only
(3) (a), (b) and (c) only
(4) (b), (c) and (d) only

---

52. इ.स. 1919 च्या कायद्यामध्ये खालीलपैकी कोणत्या तरतुदी होत्या ?

(a) भारत मंत्र्याचे वेतन भारतीय तिजोरीतून द्यावे.
(b) या कायद्याने लोकसेवा आयोगाची स्थापना झाली.
(c) इंडिया कौन्सिलचे महत्व कमी झाले.
(d) या कायद्याने केन्द्र व राज्य सरकारच्या विषय सूचींचे विभाजन करण्यात आले.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (b) फक्त
(2) (b) आणि (c) फक्त
(3) (b), (c) आणि (d) फक्त
(4) (a), (b) आणि (c) फक्त

Which of the following provisions were made through 1919 Act ?

(a) Salaries of Secretary State of India was from Indian expenditure.
(b) Public Service Commission was established through this Act.
(c) Importance of India Council was reduced.
(d) This act made provision for classification of the Central and State subjects.

**Answer options :**

(1) (a) and (b) only
(2) (b) and (c) only
(3) (b), (c) and (d) only
(4) (a), (b) and (c) only

---

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

www.mpscmaterial.com

53. इ.स. 1920 मध्ये खालीलपैकी कोणाच्या अध्यक्षतेखाली 'मुंबई कामगार समितीची' स्थापना केली होती ?

(1) नारायण चंदावरकर
(2) नारायण मेघाजी लोखंडे
(3) एस.एम. जोशी
(4) बी.पी. वाडिया

Under whose Presidentship 'Mumbai Kamgar Samiti' was established in 1920 ?

(1) Narayan Chandavarkar
(2) Narayan Meghaji Lokhande
(3) S.M. Joshi
(4) B.P. Wadia

54. 1 नोव्हेंबर 1858 रोजी गव्हर्नर जनरल लॉर्ड कॅनिंग यांनी राणीचा जाहिरनामा कोणत्या ठिकाणी वाचून दाखविला ?

(1) कलकत्ता (2) अलाहाबाद (3) दिल्ली (4) मेरठ

At which of the following places 'Queens Declaration' was read by Governor General Lord Canning on 1st November 1858 ?

(1) Calcutta (2) Allahabad (3) Delhi (4) Meerut

55. लंडन डेली हेराल्डच्या कोणत्या प्रतिनिधीने वडाळ्याच्या मिठागारामध्ये सत्याग्रही समवेत उभे राहुन आपली निरीक्षणे लंडनला पाठवली होती ?

(1) वेब मिलर
(2) जॉर्ज स्लोकोंब
(3) पेरिन कॉमटन
(4) ए. मॅकाय

Which correspondent of the London Daily Herald stood with the satyagrahis of Wadala Salt Factory and sent his observations to London ?

(1) Webb Miller
(2) George Slokombh
(3) Perin Comton
(4) A. Mykay

56. ब्रिटिश काळात भारतीयांसाठी लष्करात कोणते उच्च पद होते ?

(1) सरदार (2) सुभेदार (3) हवालदार (4) कॅप्टन

Which was the highest position for Indians in military in British period ?

(1) Sardar (2) Subhedar (3) Hawaldar (4) Captain

57. लंडनमधील इंडिया हाऊसकडून दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्या कोणाच्या देणगीतून दिल्या जात होत्या ?

(1) शामजी कृष्ण वर्मा
(2) सरदारसिंह रेवाभाई राणा
(3) जेमशेटजी जीजीभाई
(4) जमनालाल बजाज

Scholarships given by India House in London were given through, whose donation ?

(1) Shyamji Krishna Varma
(2) Sardarsingh Revabhai Rana
(3) Jemshetji Jijibhai
(4) Jamnalal Bajaj



www.mpscmaterial.com

58. 'आखिल भारतीय मुस्लीम लिग' ची स्थापना कोठे झाली ?

(1) ढाक्का (2) लाहोर (3) कराची (4) दिल्ली

Where was 'All India Muslim League' founded ?

(1) Dhaka (2) Lahore (3) Karachi (4) Delhi

---

59. आखिल भारतीय सत्याग्रह कौन्सिल कोणाच्या नेतृत्वाखाली स्थापन झाले ?

(1) सरोजिनी नायडू (2) सुचेता कृपलानी

(3) मीनु मसानी (4) जयप्रकाश नारायण

Under whose leadership was the Akhil Bhartiya Satyagrah Council established ?

(1) Sarojini Nayadu (2) Sucheta Kruplani

(3) Minu Masani (4) Jayprakash Narayan

---

60. इ.स. 1879 च्या 'दि डेक्कन ॲग्रीकल्चर रिलीफ ॲक्ट' द्वारे शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी कोणत्या तरतुदींची शिफारस करण्यात आली होती ?

(a) सिंचन आयोगाची स्थापना

(b) तगाईची सोय असावी

(c) शेतकरी बँका सुरू करण्यात याव्यात

(d) शेतकऱ्यांच्या जमिनी सावकारांच्याकडे सहजा सहजी हस्तांतरीत होणार नाहीत अशी तरतूद

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (b) फक्त (2) (b) आणि (c) फक्त

(3) (a), (b) आणि (c) फक्त (4) (b), (c) आणि (d) फक्त

Which of the following recommendation were made through 'The Deccan Agricultural Relief Act' 1879 for upliftment of Farmers condition ?

(a) Establishment of Irrigation Commission

(b) Facilities of loan system

(c) To start 'Farmers Bank'

(d) To make it difficult for transfer of Farmers Land to moneylenders

**Answer options :**

(1) (a) and (b) only (2) (b) and (c) only

(3) (a), (b) and (c) only (4) (b), (c) and (d) only

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.mpscmaterial.com

**61.** योग्य जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | ताडोबा राष्ट्रीय उद्यान | (i) | चंद्रपूर |
| (b) | पंडित जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय उद्यान | (ii) | पेंचनागपूर |
| (c) | गुगामाळ राष्ट्रीय उद्यान | (iii) | अमरावती |
| (d) | नवेगाव राष्ट्रीय उद्यान | (iv) | गोंदिया |

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a)-(iii), (b)-(ii), (c)-(i), (d)-(iv)
(2) (a)-(i), (b)-(iii), (c)-(ii), (d)-(iv)
(3) (a)-(i), (b)-(ii), (c)-(iii), (d)-(iv)
(4) (a)-(ii), (b)-(iv), (c)-(iii), (d)-(i)

Match the correct pairs :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Tadoba National Park | (i) | Chandrapur |
| (b) | Pandit Jawaharlal Nehru National Park | (ii) | Pench-Nagpur |
| (c) | Gugamal National Park | (iii) | Amravati |
| (d) | Navegoan National Park | (iv) | Gondia |

**Answer options :**

(1) (a)-(iii), (b)-(ii), (c)-(i), (d)-(iv)
(2) (a)-(i), (b)-(iii), (c)-(ii), (d)-(iv)
(3) (a)-(i), (b)-(ii), (c)-(iii), (d)-(iv)
(4) (a)-(ii), (b)-(iv), (c)-(iii), (d)-(i)

---

**62.** भारताच्या स्थानाविषयी खालील विधानांचा विचार करा.

(a) पूर्व आणि पश्चिम आशियाच्या दरम्यान भारताला मध्यवर्ती स्थान लाभले आहे.
(b) भारताचा जगाशी असलेल्या सागरी संपर्काचा इतिहास हा भूभागावरील सहसंबंधापेक्षा जुना आहे.
(c) हिंदी महासागरावर भारताइतका लांब समुद्र किनारा इतर कोणत्याही देशाला लाभला नाही.
(d) भारताच्या उत्तर-पूर्व दिशेला पाकिस्तान आणि अफगाणिस्तान या देशांच्या भूसीमा आहेत.

वरीलपैकी कोणती विधाने **बरोबर** आहेत ?

(1) फक्त (a) आणि (d)
(2) फक्त (a) आणि (c)
(3) (a), (b) आणि (c)
(4) (a), (b) आणि (d)

Consider the following statements about the location of India.

(a) India has the central location between the east and west Asia.
(b) India's maritime contacts with the world have a longer history than its land based relationship.
(c) No other country has a long coastline on the Indian Ocean as India has.
(d) India shares its land with Pakistan and Afghanistan in the north-east.

Which of the above statements are **correct** ?

(1) (a) and (d) only
(2) (a) and (c) only
(3) (a), (b) and (c)
(4) (a), (b) and (d)

---



www.mpscmaterial.com

63. भारताचा अक्षवृत्तीय व रेखावृत्तीय विस्तार किती आहे?

(1) 29° पेक्षा जास्त (2) 30° पेक्षा जास्त (3) 31° पेक्षा जास्त (4) 32° पेक्षा जास्त

What is the latitudinal and longitudinal extent of India ?

(1) More than 29° (2) More than 30° (3) More than 31° (4) More than 32°

---

64. जोड्या जुळवा.

| | **जिल्हे** | | **स्थापना वर्ष** |
|---|---|---|---|
| (a) | पालघर | (i) | 2014 |
| (b) | गोंदीया | (ii) | 1998 |
| (c) | नंदुरबार | (iii) | 1999 |
| (d) | गडचिरोली | (iv) | 1982 |

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a)-(iv), (b)-(iii), (c)-(ii), (d)-(i) (2) (a)-(i), (b)-(iii), (c)-(ii), (d)-(iv)

(3) (a)-(iv), (b)-(ii), (c)-(iii), (d)-(i) (4) (a)-(i), (b)-(ii), (c)-(iii), (d)-(iv)

Match the following.

| | **District** | | **Establishment Year** |
|---|---|---|---|
| (a) | Palghar | (i) | 2014 |
| (b) | Gondiya | (ii) | 1998 |
| (c) | Nandurbar | (iii) | 1999 |
| (d) | Gadchiroli | (iv) | 1982 |

**Answer options :**

(1) (a)-(iv), (b)-(iii), (c)-(ii), (d)-(i) (2) (a)-(i), (b)-(iii), (c)-(ii), (d)-(iv)

(3) (a)-(iv), (b)-(ii), (c)-(iii), (d)-(i) (4) (a)-(i), (b)-(ii), (c)-(iii), (d)-(iv)

---

65. खालीलपैकी कोणती भीमा नदीची उपनदी नाही?

(1) सीना (2) माण (3) भामा (4) तेरणा

Which of the following is not a tributary of Bhima river ?

(1) Sina (2) Man (3) Bhama (4) Terna

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.mpscmaterial.com

66. योग्य जोड्या जुळवा.

| | खनिजे | | खाण क्षेत्र |
|---|---|---|---|
| (a) | मँगनिज | (i) | सुरजागड |
| (b) | लोहखनिज | (ii) | जानोली |
| (c) | बॉक्साईट | (iii) | चिखला |
| (d) | क्रोमाईट | (iv) | उदगिरी |

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a)-(iii), (b)-(iv), (c)-(ii), (d)-(i) (2) (a)-(i), (b)-(ii), (c)-(iv), (d)-(iii)

(3) (a)-(iii), (b)-(i), (c)-(iv), (d)-(ii) (4) (a)-(iii), (b)-(i), (c)-(ii), (d)-(iv)

Match the following :

| | Minerals | | Mining Area |
|---|---|---|---|
| (a) | Manganese | (i) | Surjagad |
| (b) | Iron Ore | (ii) | Janoli |
| (c) | Bauxite | (iii) | Chikhala |
| (d) | Chromite | (iv) | Udgiri |

**Answer options :**

(1) (a)-(iii), (b)-(iv), (c)-(ii), (d)-(i) (2) (a)-(i), (b)-(ii), (c)-(iv), (d)-(iii)

(3) (a)-(iii), (b)-(i), (c)-(iv), (d)-(ii) (4) (a)-(iii), (b)-(i), (c)-(ii), (d)-(iv)

---

67. महाराष्ट्रातील खालील दिलेल्या जिल्ह्यांपैकी 2011 च्या जनगणनेनुसार सर्वात जास्त लोकसंख्या घनता कोणत्या जिल्ह्याची आहे ?

(1) गोंदिया (2) वाशिम (3) हिंगोली (4) अमरावती

Which of the following district of Maharashtra has the highest population density as per 2011 census ?

(1) Gondiya (2) Washim (3) Hingoli (4) Amravati

---



www.mpscmaterial.com

68. महाराष्ट्रात सर्वात जास्त वनक्षेत्र खालीलपैकी कोणत्या वनांनी व्यापलेले आहे ?

(a) पानगळ वने (b) रुंदपर्णी वने

(c) दलदलीची वने (d) काटेरी वने

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) (2) फक्त (d) (3) (a), (b) आणि (d) (4) वरील सर्व

Which of the following forests occupies the largest area in Maharashtra ?

(a) Deciduous Forests (b) Broadleaf Forests

(c) Swamp Forests (d) Thorn Forests

**Answer options :**

(1) Only (a) (2) Only (d) (3) (a), (b) and (d) (4) All above

---

69. खालीलपैकी कृष्णा नदीच्या उपनद्यांची योग्य जोडी कोणती आहे ?

(1) अर्कावती – भवानी (2) कोयना – प्राणहिता

(3) मुसी – हेमावती (4) मलप्रभा – तुंगभद्रा

Which of the following is the correct pair of tributaries of river Krishna ?

(1) Arkavati - Bhavani (2) Koyana - Pranhita

(3) Musi - Hemavati (4) Malprabha - Tungabhadra

---

70. __________ वृक्षाचे लाकूड अत्यंत मऊ असल्याने काडीपेटीतील काड्या बनवण्यासाठी त्याचा उपयोग करतात ?

(1) तेंदू (2) सागवान (3) पाईन (4) शाल्मली

The wood of __________ tree is very soft so it is used to make the sticks of the match box.

(1) Tendu (2) Teak (3) Pine (4) Shalmali

---

71. भारतातील सुधारणा धोरणामुळे बँकातील विदेशी गुंतवणूक __________ टक्के पर्यंत वाढविण्यात आली.

(1) 51 (2) 64 (3) 54 (4) 74

The reform policies raised the foreign investment limit in banks upto __________ percent.

(1) 51 (2) 64 (3) 54 (4) 74

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com

72. **विधान (a)** : भारतीय अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने ग्रामीण अर्थव्यवस्था आहे.

**विधान (b)** : 2011 जनगणनेनुसार देशातील ग्रामीण लोकसंख्या जवळपास 83.25 कोटी (एकूण लोकसंख्येतील 68.8%) इतकी आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) विधान (a) सत्य आहे परंतु (b) असत्य आहे.

(2) विधान (a) असत्य आहे परंतु (b) सत्य आहे.

(3) दोन्ही विधाने (a) आणि (b) सत्य असून (b) हे (a) चे योग्य स्पष्टीकरण आहे.

(4) दोन्ही विधाने (a) आणि (b) सत्य असून (b) हे (a) चे योग्य स्पष्टीकरण नाही.

**Statement (a)** : Indian Economy is primarily a rural economy.

**Statement (b)** : As per, 2011 census the rural population of the country is about 83.25 crores (68.8% of the total population).

**Answer options :**

(1) Statement (a) is true but (b) is false.

(2) Statement (a) is false but (b) is true.

(3) Both statement (a) and (b) are true and (b) is the correct explanation of (a).

(4) Both statement (a) and (b) are true and (b) is the incorrect explanation of (a).

---

73. जुलै 1991 पासून सरकारने व्यापार क्षेत्रात सुधारणांची मालिका सुरू केली असून त्यांचा हेतू भारतीय अर्थव्यवस्था उर्वरित जगाशी उत्तम जोडणे हा आहे. त्यात पुढील प्रमुख सुधारणा उपाय होते;

(a) रुपयाचे अवमूल्यन

(b) रुपयाची परिवर्तनीयता प्रथम व्यापार आणि नंतर चालू खात्यावर

(c) आयात शिथिलीकरण आणि व्यापाराचे बिगर सरकारीकरण

(d) निर्यात वृद्धी उपाय

खालीलपैकी कोणते **बरोबर** आहे ?

(1) फक्त (a) आणि (b) (2) फक्त (c) आणि (d)

(3) फक्त (a), (b) आणि (c) (4) सर्व (a), (b), (c) आणि (d)

Since July 1991, the government has introduced a series of reforms in the trade sector which are aimed to help integration of the Indian economy better with the rest of the world. Among these the reform measures consisted of;

(a) Devaluation of the rupee

(b) Convertibility of rupee first on trade account and then on current account

(c) Liberalization of import, and decanlisation of trade

(d) Measures to promote exports

Which of the following is **correct** ?

(1) Only (a) and (b) (2) Only (c) and (d)

(3) Only (a), (b) and (c) (4) All the (a), (b), (c) and (d)

---



www.mpscmaterial.com

74. दिपा नायर यांनी जागतिकीकरणाची व्याख्या अशी दिली :

(a) देशाच्या राजकीय सीमा ओलांडून आर्थिक कार्यात कपात.

(b) देशाच्या राजकीय सीमा ओलांडून आर्थिक क्रियांचा विस्तार.

(c) औद्योगिक क्षेत्रासाठी जागतिक बाजाराचा उदय.

(d) शेती व औद्योगिक क्षेत्रासाठी जागतिक बाजाराचा उदय.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) (2) (b) (3) (c) (4) (a) आणि (d)

Deepa Nayyar defined Globalisation as :

(a) Reduction in economic activities across political boundaries of nation.

(b) Expansion of economic activities across political boundaries of nation.

(c) The emergence of global markets for industrial sector only.

(d) The emergence of global market for agricultural and industrial market.

**Answer options :**

(1) (a) (2) (b) (3) (c) (4) (a) and (d)

---

75. उदारीकरण हे आर्थिक वृद्धी व लोककल्याणासाठी प्रोत्साहन देणारे आहे असे कोणी सांगितले आहे ?

(1) महमद युनूस (2) ॲडम स्मिथ

(3) मनमोहन सिंग (4) एम.एस. स्वामीनाथन

Who said that liberalization is going to promote economic growth and public welfare ?

(1) Mohammad Yunus (2) Adam Smith

(3) Manmohan Singh (4) M.S. Swaminathan

---

76. घाऊक किंमतीच्या निर्देशांकातील वाढ हा निर्देशांक समजला जातो :

(1) आर्थिक धोरण (2) महागाई (3) निर्यात (4) आयात

Growth in the index of wholesale prices is considered as an index of :

(1) Economic Policy (2) Inflation (3) Export (4) Import

---

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

www.mpscmaterial.com

77. सरकारने __________ स्वरूपात भांडवली प्रवाहाचे उदारीकरण केले.

(1) प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक
(2) बहुराष्ट्रीय कंपन्यांवर नियंत्रण
(3) सार्वजनिक उपक्रमांना प्रोत्साहन
(4) भारतीय उद्योगांना प्रोत्साहन

The government also liberalised the capital flows in form of __________.

(1) FDI
(2) Control on MNC's
(3) Promotion of PSU's
(4) Promotion of Indian industries

---

78. 1991 च्या सुरुवातीला भारतात प्रमुख आर्थिक संकट अनुभवास आले. या संकटातून उद्भवलेल्या समस्या सोडविण्यासाठी सरकारने पुढील कार्यक्रम सुरू केला :

(a) समग्र आर्थिक स्थिरीकरण
(b) संरचनात्मक सुधारणा
(c) राष्ट्रीय शिक्षण धोरण

खालीलपैकी कोणते **बरोबर** आहे ?

(1) फक्त (a)
(2) फक्त (b)
(3) दोन्ही (a) आणि (b)
(4) फक्त (c)

In early 1991, a major economic crisis surfaced in India. To tackle the problems emanating from this crisis, the government introduced a programme of :

(a) Macroeconomic stabilization
(b) Structural reforms
(c) National education policy

Which of the following is **correct** ?

(1) Only (a)
(2) Only (b)
(3) Both the (a) and (b)
(4) Only (c)

---

79. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) ने 1991 मध्ये भारताला मदत देण्यासाठी खालीलपैकी कोणती अट ठेवली होती ?

(1) आयात शूल्कात वाढ
(2) निर्यातीत वाढ
(3) भारतीय रूपयाचे अवमूल्यन
(4) आंतरराष्ट्रीय व्यापार कमी करणे

Which of the following condition was laid down by IMF in 1991, for the grant of assistance to India ?

(1) Raise the import duty
(2) Grow the export
(3) Devaluation of the Indian Rupee
(4) Reduce international trade

---



www.mpscmaterial.com

80. खालीलपैकी कोणत्या राज्यात पहिल्या निर्यात प्रक्रिया क्षेत्राची स्थापना झाली ?

(1) महाराष्ट्र (2) गुजरात (3) राजस्थान (4) दिल्ली

In which state was the first Export Processing Zone (EPZ) setup ?

(1) Maharashtra (2) Gujarat (3) Rajasthan (4) Delhi

81. भारतीय राज्यघटनेतील पंचायत राज्य व्यवस्थेशी संबंधित कलम 243-A यामध्ये खालीलपैकी कोणती तरतूद आहे ?

(1) राखीव जागा (2) ग्राम सभा

(3) पंचायतींची निवडणूक (4) पंचायतींचे लेखापरिक्षण

Article 243-A of the Indian Constitution related to the Panchayat Raj provides for which of the following ?

(1) Reservation of seats (2) Gram Sabha

(3) Election of Panchayat (4) Audit of Panchayat

82. महाराष्ट्रातील जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या यांच्या स्थापनेशी संबंधित असणारा अधिनियम कोणता आहे ?

(1) अधिनियम 1958 (2) अधिनियम 1961 (3) अधिनियम 1988 (4) अधिनियम 1948

Which Act is related to the establishment of Zilla Parishads and Panchayat Samitis in Maharashtra ?

(1) Act 1958 (2) Act 1961 (3) Act 1988 (4) Act 1948

83. जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीबाबत पुढील विधाने विचारात घ्या.

(a) स्थायी समितीसाठी स्वतंत्र सभापतीची तरतूद आहे.

(b) जिल्हा परिषदेचे अध्यक्ष हे स्थायी समितीचे अध्यक्ष असतात.

(c) जि.प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी हे स्थायी समितीचे सचिव असतात.

(d) जि.प. चे उपमुख्य कार्यकारी अधिकारी हे स्थायी समितीचे सचिव म्हणून काम पाहतात.

वरीलपैकी **योग्य** विधाने निवडा.

(1) (a), (b), (c) बरोबर (2) (b), (c) बरोबर

(3) (b), (d) बरोबर (4) यापैकी नाही

Consider the statements regarding Standing Committee of Zilla Parishad.

(a) There is a provision of independent Chairman for Standing Committee.

(b) Zilla Parishad Chairman is the Chairman of Standing Committee.

(c) Chief Executive Officer of Zilla Parishad is secretary of Standing Committee.

(d) Deputy Chief Executive Officer works is the secretary of Standing Committee of ZP.

Choose the **correct** statements.

(1) (a), (b), (c) Correct (2) (b), (c) Correct

(3) (b), (d) Correct (4) None of these

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com

84. भारतीय राज्यघटनेतील खालीलपैकी कोणते कलम ग्रामसभेशी संबंधित आहे ?

(1) कलम 244 C (2) कलम 243 D (3) कलम 243 A (4) कलम 241 A

Which of the following Articles of the Indian Constitution of India deals with Gramsabha ?

(1) Article 244 C (2) Article 243 D (3) Article 243 A (4) Article 241 A

---

85. लॉर्ड रिपनचा ठराव, ज्याला भारताच्या स्थानिक स्वराज्य संस्थांचा 'मॅग्ना कार्टा' असे म्हणतात, कोणत्या वर्षी संमत झाला ?

(1) 1726 (2) 1935 (3) 1882 (4) 1687

Lord Ripon's resolution which is known as 'Magna Carta' of Local Self Government in India was passed in which year ?

(1) 1726 (2) 1935 (3) 1882 (4) 1687

---

86. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कोलंबिया विद्यापीठातील एम.ए.च्या पदवीसाठी कोणता प्रबंध लिहीला ?

(1) प्राचीन भारतातील व्यापार (2) भारताच्या राष्ट्रीय नफ्याचा वाटा

(3) रूपयाचा प्रश्न (4) बुद्ध आणि त्याचा धम्म

What thesis did Dr. Babasaheb Ambedkar write for his M.A. degree at Columbia University ?

(1) Ancient Indian Commerce (2) National Divident of India

(3) Problem of Rupee (4) Buddha and his Dhamma

---

87. आर्य बांधव समाज ही गुप्त संघटना उभी करण्यात खालीलपैकी कोणाची महत्वाची भूमिका होती ?

(1) शामराव देशपांडे (2) श्रीधर हरी खेर

(3) व्यंकटेश खानखोजे (4) सिद्धनाथ कृष्ण काणे

Who among the following played an important role in setting up the secret organization Aryabandhav Samaj ?

(1) Shamrao Deshpande (2) Shridhar Hari Khair

(3) Venkatesh Khankhoje (4) Shidhnath Krushna Kane

---



www.mpscmaterial.com

88. इ.स. 1920 मध्ये माणगांव येथील दक्षिण महाराष्ट्र बहिष्कृत वर्गाच्या परिषदेच्या आयोजनाशी खालीलपैकी कोणत्या व्यक्ती संबंधित होत्या ?

(a) आप्पासाहेब दादागौंडा पाटील (b) दत्तोबा पवार

(c) तुकाराम गणेशाचार्य (d) गंगाराम कांबळे

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (b) फक्त (2) (b) आणि (c) फक्त

(3) (c) आणि (d) फक्त (4) वरील सर्व बरोबर

Which of the following personalities were related with organisation of Dakshin Maharashtra Bahishkrut Mangaon Parishad in 1920 ?

(a) Appasaheb Dadagowda Patil (b) Dattoba Pawar

(c) Tukaram Ganeshacharya (d) Gangaram Kamble

**Answer options :**

(1) (a) and (b) only (2) (b) and (c) only

(3) (c) and (d) only (4) all of the above are correct

---

89. खालीलपैकी योग्य विधान ओळखा.

(a) श्रीमती विल्सन मुलीसाठी मुंबईत तीन शाळा चालवित होत्या.

(b) स्कॉटिश मिशनने पुण्यात पहिली इंग्रजी शाळा सुरू केली.

(c) मुलीच्या शिक्षणाचा प्रारंभ मुंबईत अमेरिकन मराठी मिशनने केला.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (b), (c) (2) (b), (c) (3) केवळ (b) (4) केवळ (a)

Identify the correct statement from the following.

(a) Mrs. Wilson ran three school in Mumbai for Girls.

(b) Scottish Mission started the first English school in Pune.

(c) The American Marathi Mission started the education of girls in Mumbai.

**Answer options :**

(1) (a), (b), (c) (2) (b), (c) (3) only (b) (4) only (a)

---

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

www.mpscmaterial.com

90. विष्णुबुवा ब्रह्मचारी यांनी खालीलपैकी कोणत्या वृत्तपत्राद्वारे वैदीक धर्मावरील टीकेला चोख प्रत्युत्तर दिले होते ?

(1) वर्तमान दीपिका (2) ज्ञानोदय

(3) ज्ञान प्रकाश (4) संस्कृत चंद्रीका

Vishnubuwa Brahmachari retorted to the criticism on vedic religion through which of the following Newspaper ?

(1) Vartman Deepika (2) Dnyanoday

(3) Dnyan Prakash (4) Sanskrit Chandrika

---

91. दक्षिणपूर्व आशियाई देशांबरोबरचे संबंध दृढ करण्यासाठी भारताने राबविलेल्या परराष्ट्र धोरणाला सध्या काय नाव दिले आहे ?

(1) मस्ट ईस्ट (2) ॲक्ट ईस्ट (3) फास्ट ईस्ट (4) जस्ट ईस्ट

What is the current name given to the foreign policy implemented by India to increase relations with South-East Asian Countries ?

(1) Must East (2) Act East (3) Fast East (4) Just East

---

92. 1960 मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सिंधु जल करारानुसार भारत आणि पाकिस्तानला कोणत्या नद्या देण्यात आल्या ?

(1) रावी, सतलज आणि बियास भारताला आणि सिंधु, चिनाब आणि झेलम पाकिस्तानला

(2) रावी, सतलज आणि बियास पाकिस्तानला आणि सिंधु, चिनाब आणि झेलम भारताला

(3) मेघना, पद्मा आणि सोमेश्वरी भारताला आणि सिंधु, महानंदा आणि कोसी पाकिस्तानला

(4) यापैकी नाही

Which rivers were given to India and Pakistan under the Indus water treaty between India and Pakistan in 1960 ?

(1) Ravi, Sutlej and Beas to India and Indus, Chenab and Jhelum to Pakistan

(2) Ravi, Sutlej and Beas to Pakistan and Indus, Chenab and Jhelum to India

(3) Meghana, Padma, and Someshwari to India and Indus, Mahananda, and Kosi to Pakistan

(4) None of these

---



www.mpscmaterial.com

93. 'टु स्टेट सोल्युशन' हा शब्द काहीवेळा बातम्यांमध्ये कोणत्या देशांच्या घडामोडींच्या संदर्भात उल्लेखला जातो ?

(1) चीन (2) उत्तर कोरिया (3) इराक (4) इस्राईल

The term, 'Two state solution', is sometimes mentioned in news in the context of the affairs of which country ?

(1) China (2) North Korea (3) Iraq (4) Israel

---

94. खालीलपैकी **अयोग्य** विधान/ने कोणते/ती ?

(a) नीमरान संवाद हा भारत-चीन संबंधांविषयी आहे.

(b) ओटावा संवाद हा भारत-पाकिस्तान संबंधांविषयी आहे.

(c) शांग्री-ला संवाद हा भारत-सिंगापुर संबंधांविषयी आहे.

(d) रायसीना संवाद हा भारताच्या भुराजकीय आणि भुआर्थिक गोष्टीसंबंधीची शिखर परिषद आहे.

**योग्य** पर्याय निवडा :

(1) (a), (b), (c) (2) (b), (c), (d) (3) (a), (c) (4) (c), (d)

Which of the following is/are **incorrect** statement/s ?

(a) The Neemrana Dialogue is related to India-China Relations.

(b) The Ottawa Dialogue is related to India-Pakistan Relations.

(c) Shangri-La Dialogue is related to India-Singapore Relations.

(d) Raisina Dialogue is India's flagship conference of geo politics and geo economics.

Choose **correct** answer :

(1) (a), (b), (c) (2) (b), (c), (d) (3) (a), (c) (4) (c), (d)

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com

95. खालीलपैकी कोणता देश दक्षिण आशियाई मुक्त व्यापार क्षेत्र (SAFTA) चा सभासद नाही ?

(1) अफगाणिस्तान (2) भूतान (3) मालदिव (4) म्यानमार

Which of the following country is not a member of South Asian Free Trade Area (SAFTA) ?

(1) Afghanistan (2) Bhutan (3) Maldives (4) Myanmar

---

96. भारत सरकारद्वारे नेमण्यात आलेला न्या. जी. रोहिणी यांच्या नेतृत्वाखालील आयोग चर्चेत आहे. या आयोगाचा उद्देश काय आहे ?

(1) कुस्तीपटुंवर होणारा अन्याय दुर करणे.

(2) प्रबळ ओबीसी जाती-गटांमधील आरक्षण आणि फायदे यांचे केंद्रीकरण तपासणे.

(3) संरक्षण क्षेत्रातील आधुनिकीकरणासाठी सुधारणा सुचवणे.

(4) भ्रष्टाचार आणि काळा पैसा यावर नियंत्रण ठेवणे.

The Commission led by Justice G. Rohini, appointed by government of India is in the news. What is the purpose of this Commission ?

(1) To remove injustice done to wrestlers.

(2) To examine the concentration of reservation and benefits among dominant OBC caste groups.

(3) To suggest reforms to modernize the defence sector.

(4) To control the corruption and black money.

---



www.mpscmaterial.com

97. 2023 मधील शांततेसाठीचा नोबेल पुरस्कार कोणाला देण्यात आला आहे ?

(1) नर्गिस मोहम्मदी (2) पियरे ऑगस्टिनी
(3) जॉन फॉस्से (4) क्लॉडीया गोल्डीन

Who has been awarded the 'Nobel Peace Prize' for the year 2023 ?

(1) Narges Mohammadi (2) Pierre Agostini
(3) Jon Fosse (4) Claudia Goldin

---

98. G-20 मध्ये पुढील देशांचा समावेश होत नाही ?

(a) अर्जेंटिना (b) इटली (c) इंडोनेशिया (d) पाकिस्तान (e) ताजिकिस्तान

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (d) (2) (a), (c), (e) (3) (d), (e) (4) (c), (e)

G-20 does not include the following countries.

(a) Argentina (b) Italy (c) Indonesia (d) Pakistan (e) Tajikistan

**Answer options :**

(1) (a), (d) (2) (a), (c), (e) (3) (d), (e) (4) (c), (e)

---

99. ग्राहक संरक्षण कायदा 2019 हा कोणत्या हेतूसाठी लागू करण्यात आला ?

(a) 1986 च्या ग्राहक संरक्षण कायद्याची जागा घेणे.
(b) ग्राहक संरक्षणाच्या तरतूदी अधिक बळकट करणे.
(c) ऑनलाईन व्यवहारात ग्राहकाला संरक्षण देणे.
(d) जागतिकीकरणाच्या काळात ग्राहकाचे रक्षण करणे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) (2) फक्त (a) आणि (d)
(3) फक्त (b), (c) आणि (d) (4) (a), (b), (c) आणि (d)

What is the purpose of 'Consumer Protection Act 2019' ?

(a) Replacing the 'Consumer Act 1986'.
(b) Strengthening consumer protection provisions.
(c) Protecting the consumer in online transactions.
(d) Protecting the consumer in the age of globalization.

**Answer options :**

(1) Only (a) (2) Only (a) and (d)
(3) Only (b), (c) and (d) (4) (a), (b), (c) and (d)

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.mpscmaterial.com

**100.** जागतिक पर्यटन दिन 2023 ची थीम काय आहे ?

(1) 'पर्यटन आणि सांस्कृतिक विविधता' (2) 'उत्तम उद्यासाठी शाश्वत पर्यटन'

(3) 'पर्यटन आणि हरित गुंतवणुक' (4) 'पर्यटनातील नवीन क्षितीजे शोधणे'

What is the theme of World Tourism Day 2023 ?

(1) 'Tourism and Cultural Diversity' (2) 'Sustainable Tourism for a Better Tomorrow'

(3) 'Tourism and Green Investment' (4) 'Exploring New Horizons in Tourism'

---

- o 0 o -

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



www.mpscmaterial.com

## सूचना — ( पृष्ठ 1 वरून पुढे.... )

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

**प्र. क्र. 201.** सतीची चाल नष्ट करण्यासाठी कोणी मूलतः प्रयत्न केले ?

(1) स्वामी दयानंद सरस्वती (2) ईश्वरचंद्र विद्यासागर

(3) राजा राममोहन रॉय (4) गोपाळकृष्ण गोखले

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) राजा राममोहन रॉय" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. **201** समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

**प्र. क्र. 201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तर-क्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्न-क्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

SEAL

www.mpscmaterial.com